Reg. No. NP CITY/236/2018-20.

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## प्राधिकृत प्रकाशन

वर्ष ९, अंक १५] गुरुवार ते बुधवार, एप्रिल २०-२६, २०२३/चैत्र ३०-वैशाख ६, शके १९४५ [पृष्ठे ७, किंमत : रुपये ११.००

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी प्रत्येक विभागाच्या पुरवणीला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग एक-अ—नागपूर विभागीय पुरवणी

**(भाग चार-ब मध्ये प्रसिध्द करण्यात आलेले आहेत त्यांव्यतिरिक्त) केवळ नागपूर विभागाशी संबंधित असलेले महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपालिका बरो, जिल्हा नगरपालिका, प्राथमिक शिक्षण व स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम या अन्वये काढण्यात आलेले आदेश व अधिसूचना.**

भाग १-अ (ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. १०२.

**नगर विकास विभाग**

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२, दिनांक ०६ एप्रिल, २०२३.

**महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६.—**

**आदेश**

क्रमांक टिपीएस-२४२१-८५९-प्र.क्र. १०७—२०२२-नवि-९.—

ज्याअर्थी, नागपूर शहराची सुधारित विकास योजना महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ (१९६६ चा महा. ३७ चा) (यापुढे "उक्त अधिनियम" असे संबोधले आहे) शासन अधिसूचना, नगर विकास विभाग अधिसूचना क्र. टिपीएस-२४९६-२६४३-प्र.क्र. ३०० (अ)-९७-नवि-९, दिनांक ०७-०१-२००० अन्वये भागशः मंजूर व क्र.टिपीएस-२४००-१६२८-प्र.क्र. २०००-नवि-९, दिनांक १० सप्टेंबर, २००१ नुसार अंतिमतः मंजूर करण्यात आलेली असून ती अनुक्रमे दिनांक १ मार्च, २००० व दिनांक २१ सप्टेंबर, २००१ पासून अंमलात आलेली आहे. (यापुढे "उक्त विकास योजना" असे संबोधले आहे);

आणि ज्याअर्थी, उक्त विकास योजनेमध्ये, मौजे चिंचभुवन येथील खसरा क्र. २३० पै., २३१पे., २३७ पै., २४० पै., २४१ पै., २४३, २४४ पै., २४५, २४६ पै., २४७, २४८, २४९, २५० पै., २५१ पै., २५२ पै., २५३ पै., २५५पै., २५६ पै., २६२ पै., २६४, २६५ पै., २६६ पै., ३७५ पै. मधील एकूण अंदाजे क्षेत्र ४.७५२ हेक्टर जमीन ( "उक्त आरक्षित जमीन" असे संबोधिले आहे) "आरक्षण क्र. एमएस-११८ "मार्केट" करीता (यापुढे "उक्त आरक्षण" असे संबोधिले आहे ) आरक्षित असून उक्त आरक्षणाचे समुचित प्राधिकरण नागपूर महानगर पालिका, नागपूर हे आहेत (यापुढे "उक्त प्राधिकरण" असे संबोधिले आहे);

आणि ज्याअर्थी, उक्त प्राधिकरणाने, उक्त आरक्षित जमीन, उक्त विकास योजना अंमलात आल्याच्या दिनांकापासून दहा वर्षाच्या कालावधीमध्ये संपादन केलेली नाही;

आणि ज्याअर्थी, उक्त आरक्षित जमिनीपैकी, सोबतच्या परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या खसरा क्र. २६४ व २६५ (यापुढे "उक्त जमीन" असे संबोधिले आहे) या जागेच्या मालकांनी आरक्षित जमीन संपादित करण्याबाबत उक्त अधिनियमाचे कलम १२७ चे उप-कलम (१) नुसार, समुचित प्राधिकरण यांचेवर दिनांक १३ एप्रिल, २०१५ रोजी सूचना (यापुढे "उक्त सूचना" असे संबोधिले आहे ) बजावलेली आहे ;

आणि ज्याअर्थी, वरील प्रमाणे उक्त अधिनियमाचे कलम १२७ चे उप-कलम (१) नुसार, उक्त सूचना बजावल्यानंतरही उक्त प्राधिकरणाने विहित कालावधीत उक्त जमीन संपादन केली नसल्याचे दिनांक १५ डिसेंबर २०२१ च्या पत्रान्वये कळविले आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम १२७ चे उप-कलम (२) नुसार, उक्त विकास योजनेमधील उक्त आरक्षणातील उक्त जमिनीमधील अदमासे १.१०८ हेक्टर इतके क्षेत्र (यापुढे " उक्त क्षेत्र " असे संबोधले आहे) आरक्षणाने बाधित होत असून सदर बाधित क्षेत्रापुरते व्यपगत झाल्याबाबत आदेश निर्गमित करणे आवश्यक आहे ;

आता, त्याअर्थी, उक्त अधिनियमाचे कलम १२७ चे उप कलम (२) नुसार प्राप्त अधिकारात राज्य शासन, उक्त विकास योजनेतील उक्त आरक्षणामधील उक्त क्षेत्रावरील आरक्षण व्यपगत झाल्याचे अधिसूचित करीत आहे व अशा प्रकारे मुक्त झालेली जमीन विकास योजनेतील लगतच्या अनुज्ञेय भूवापरा प्रमाणे जमीन मालकास विकासाकरीता उपलब्ध होईल.

## परिशिष्ट

| अ.क्र. | मौजे, तालुका व जिल्हा | मंजूर विकास योजनेमधील आरक्षण क्रमांक, खसरा क्रमांक व एकूण क्षेत्र | मंजूर विकास योजनेमधील उक्त आरक्षणामधून व्यपगत झालेल्या जमिनीचे खसरा क्रमांक व क्षेत्र | | |
|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | | |
| १ | मौजे चिंचभूवन, तालुका नागपूर, जिल्हा नागपूर. | आरक्षण क्र. एमएस- ११८ " मार्केट " खसरा क्र. २३० पै., २३१पै., २३७ पै., २४०पै., २४१ पै., २४३, २४४ पै., २४५, २४६ पै., २४७, २४८, २४९, २५० पै., २५१ पै., २५२ पै., २५३पै., २५५ पै., २५६ पै., २६२ पै., २६४, २६५ पै., २६६ पै., ३७५ पै., | " आरक्षण क्र. एमएस-११८ मार्केट " | | |
| | | | खसरा क्रमांक | एकूण क्षेत्र (हेक्टर) | आरक्षणा-मधून व्यपगत अदमासे क्षेत्र (हेक्टर) |
| | | | २६४ | ० ५३ | ० ५३ |
| | | एकूण अंदाजे क्षेत्र ४.७५२ हेक्टर | २६५ (पै) | ० ९१ | ० ५७८ |
| | | | एकूण | १ ४४ | १ १०८ |

(१) प्रस्तुत आदेशान्वये, आरक्षणातून व्यपगत झालेले क्षेत्र दर्शविणा-या भाग नकाशाची प्रत आयुक्त, नागपूर महानगरपालिका, नागापूर यांच्या कार्यालयात कार्यालयीन वेळेत नागरिकांच्या अवलोकनार्थ एक महिन्यापर्यंत ठेवण्यात आली आहे.

(२) सदर आदेश विभागाच्या **www.urban.maharashtra.gov.in** या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

**देवदत्त रहाणे,**
कार्यासन अधिकारी.

---

भाग १-अ (ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. १०३.

URBAN DEVELOPMENT DEPARTMENT

Mantralaya, Mumbai 400 021, Dated 6th April, 2023.

THE MAHARASHTRA REGIONAL AND TOWN PLANNING ACT, 1966.—

*ORDER*

No. TPS-2421-859-C.R. 107-2022-UD-9.—

Whereas, Revised Development Plan of Nagpur City has been partly sanctioned by the Government *vide* Urban Development Department's Notification No. TPS-2496-2643-CR-300 (A)-97-UD-9, dated 7th January, 2000 and finally sanctioned *vide* Notification No.TPS-2400-1628-CR-200-2000-UD-9, dated 10th September, 2001 & has come into force with effect from 1st March, 2000 & 21st September, 2001 respectively (hereinafter referred to as "the said Development Plan") under Section 31(*1*) of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (Mah. XXXVII of 1966) (hereinafter referred to as "the said Act");

And whereas, in the said Development Plan, the land bearing Khasara No. 230 pt., 231 pt., 237 pt., 240 pt., 241 pt., 243, 244 pt., 245, 246 pt., 247, 249, 250 pt., 251pt., 252 pt., 253 pt., 255 pt., 256 pt., 262 pt., 264, 265 pt., 266 pt., 375 pt. area admeasuring about 4.752 HA of Mouja Chinchbhuvan ( hereinafter referred to as “the said reserved Land”) are reserved as “Site No. MS-118 Market” (hereinafter referred to as “the said reservation”) and the Appropriate Authority for the said reservation is Nagpur Municipal Corporation (hereinafter referred to as “said authority”);

And whereas, the said land has not been acquired by the said authority within ten years from the date on which the said Development Plan came into force;

And whereas, the owner of the land bearing Khasara Nos. 264 & 265 (hereinafter referred to as “the said Land”) more particularly described in Schedule appended hereto, out of the said reserved land, had issued a Notice dated 13th April, 2015 under section 127 (*1*) of the said Act (hereinafter referred to as “the said Notice”) to the said authority;

And whereas, even after service of the said Notice as aforesaid, the said land has not been acquired within a stipulated period from the date of the service of the said Notice under sub-section (1) of Section 127 of the said Act, intimated by the said authority *vide* letter dated 15th December, 2021;

And whereas, it is accordingly expedient to notify that the reservation on the area affected by the said reservation and admeasuring approximately 1.108 hectare (hereinafter referred to as “the said area”) has lapsed under sub-section (2) of Section 127 of the said Act, from the said Development Plan;

Now, therefore, in exercise of the powers conferred by sub-section (2) of Section 127 of the said Act and of all other powers enabling it in that behalf, the Government of Maharashtra hereby Notifies that, the said reservation on the said area stands lapsed and the land so released shall be available to the landowner for the purpose of Development as otherwise permissible in the case of adjacent land under the Development Plan;

SCHEDULE

| Sr. No. | Mouje, Taluka & District | Site No., Khasara No. & Total area under reservation as per sanctioned Development Plan | Site No., Survey No. & area lapsed from reservation of sanctioned Development Plan | | |
|---|---|---|---|---|---|
| (1) | (2) | (3) | (4) | | |
| 1 | Mouja Chinchbhuvan, Taluka Nagpur, Distt. Nagpur. | “ Site No. MS-118 Market ” | “ Site No. MS-118 Market ” | | |
| | | Khasara Nos. 230pt., 231 pt., 237 pt., 240 pt., 241 pt., 243, 244 pt., 245, 246 pt., 247, 248, 249, 250 pt., 251 pt., 252 pt., 253 pt., 255 pt., 256 pt., 262 pt., 264, 265 pt., 266 pt., 375 pt. | Khasara No. | Total area (hectare) | Approx. area lapsed from reservation (hectare) |
| | | | 264 | 0 53 | 0 53 |
| | | | 265 (pt.) | 0 91 | 0 578 |
| | | Total admeasuring area 4 752 Hectare | Total | 1 44 | 1 108 |

(1) A copy of the part plan showing the area which is lapsed *vide* this order is available in the office of the Commissioner, Nagpur Municipal Corporation, Nagpur during office hours on all working days for inspection of public up to one month.

(2) This Order shall also be available on the Government website. at *www.urban.maharashtra.gov. in.*

By order and in the name of the Governor of Maharashtra,

DEODATTA RAHANE,
Section Officer.

भाग १-अ (ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. १०४.

## संचालक, नगर रचना, यांजकडून

**महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६.–**

### आदेश

क्रमांक डि.टि.पी.-वि.यो. काटोल (सु.+वा. क्षे.)-कलम-१२७(२)-आदेश-टिपीव्ही-२-१५६९-२०२३.—

ज्याअर्थी, काटोल नगर परिषदेची सुधारित + वा. क्षेत्र विकास योजना महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ (१९६६ चा महा. ३७ वा) (यापुढे " उक्त अधिनियम " असे संबोधिलेला आहे) चे कलम ३१(१) चे तरतुदीनुसार शासनाच्या, नगर विकास विभागाकडील अधिसूचना क्रमांक टिपीएस-२४०६-३१२३-प्र. क्र. १३३(A)-०७-नवि-९, दिनांक ४ नोव्हेंबर, २००८ अन्वये (यापुढे " उक्त अधिसूचना " असे संबोधलेले आहे) भागशः मंजूर केली असून ती दिनांक १५ डिसेंबर, २००८ पासून अंमलात आलेली आहे. (यापुढे " उक्त मंजूर विकास योजना " असे संबोधिलेली आहे) ;

आणि ज्याअर्थी, उक्त मंजूर विकास योजनेनुसार, मौजा काटोल येथील सर्व्हे नं. ८४८ पै. या जमिनीचे अंदाजे क्षेत्र १९३०.०० चौ. मी., आ. क्र. ५९, " दुकान केंद्र " व सर्व्हे क्र. ८४८ व ८४९ या जमिनींचे अंदाजे क्षेत्र ४०००.०० चौ. मी., आ. क्र. ६०, " प्रसुतीगृह व दवाखाना " या आरक्षणानी बाधित होत आहे (यापुढे " उक्त आरक्षणे " असे संबोधलेले आहे.) उक्त आरक्षणांच्या भूसंपादन व विकासासाठी समुचित प्राधिकरण नगर परिषद, काटोल आहे (यापुढे " उक्त समुचित प्राधिकरण " असे संबोधिलेले आहे) ;

आणि ज्याअर्थी, उक्त समुचित प्राधिकरणाने उक्त मंजूर विकास योजना अंमलात आल्याच्या दिनांकापासून १० (दहा) वर्षाच्या कालावधीत उक्त आरक्षणाखालील जमिनी संपादन केलेले नाही ;

आणि ज्याअर्थी, उक्त आरक्षणांखालील मौजा काटोल येथील सर्व्हे नं. ८४८ व ८४९ या जमिनीमधील उक्त आरक्षणांनी बाधित क्षेत्राबाबत (यापुढे " उक्त जमिनी " असे संबोधिलेले आहे) संबंधित जमीन मालक यांनी (यापुढे " उक्त जमीन मालक " असे संबोधिलेले आहे) उक्त अधिनियमाचे कलम १२७ (१) चे तरतुदीनुसार उक्त समुचित प्राधिकरणावर दिनांक ३० एप्रिल, २०१९ रोजी सूचना (यापुढे " उक्त सूचना " असे संबोधिलेले आहे) बजावलेली होती ;

आणि ज्याअर्थी, उक्त जमीनमालकांनी उक्त सूचना बजाविल्याच्या दिनांकानंतर, उक्त समुचित प्राधिकरणाने, विहित मुदतीत, उक्त आरक्षणांखालील उक्त जमिनी संपादित केलेल्या नाही अथवा उक्त जमिनीचे भूसंपादन करण्यासंबंधी उक्त अधिनियमाच्या कलम १२७ (१) चे तरतुदीनुसार आवश्यक ती उपाययोजना केलेली नाही ;

आणि ज्याअर्थी, मा. उच्च न्यायालय, मुंबई, नागपूर खंडपीठाकडील रिट याचिका क्र. २२७०/२०२१ मध्ये (यापुढे उक्त रिट याचिका असे संबोधिलेले आहे) दिनांक ८ एप्रिल, २०२२ रोजीच्या आदेशात उक्त जमिनीवरील उक्त आरक्षणे उक्त अधिनियामाच्या कलम १२७ चे तरतुदीन्वये व्यपगत झाल्याबाबत आदेश पारीत केले आहेत ;

आणि ज्याअर्थी, काटोल नगर परिषद यांनी पत्र क्र. नपका-नरवि-७७-२०२२-४८९, दिनांक ३० मे, २०२२ अन्वये उक्त आरक्षणांनी बाधित उक्त जमिनींच्या भूसंपादनाचा मा. जिल्हाधिकारी, नागपूर यांचेकड दिनांक ३० जून, २०२१ रोजीच्या पत्रान्वये सादर केलेला प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी, नागपूर यांचेकडील पत्र क्र. एलएसी-कार्या-२५-कावी-२६०-२०२१, दिनांक २० सप्टेंबर, २०२१ अन्वये उक्त सूचना बजावलेल्या तारखेपासून दोन वर्षाचा कालावधी माहे एप्रिल, २०२१ मध्ये संपूष्टात आल्यामुळे परत पाठविण्यात आलेला असल्याचे तसेच नगर परिषदेने मा. सर्वोच्य न्यायालयात विशेष अनुमती याचिका दाखल केलेली नाही, असे कळविलेले आहे ;

आणि ज्याअर्थी, सहायक संचालक, नगर रचना, नागपूर शाखा, नागपूर यांचेकडील पत्र क्र. २६६०, दिनांक १३ ऑक्टोबर, २०२२ अन्वये उक्त रिट याचिकेत मा. उच्च न्यायालय, मुंबई, नागपूर खंडपीठ यांनी पारीत केलेल्या आदेशानुसार उक्त आरक्षण व्यपगत झाल्याचे उक्त अधिनियमाच्या कलम १२७ (२) चे तरतुदीनुसार आदेश निर्गमित करणे योग्य होईल, असे कळविले आहे ;

आणि ज्याअर्थी, सहसंचालक, नगर रचना, नागपूर विभाग, नागपूर यांचेकडील पत्र क्र. १३४७, दिनांक २९ नोव्हेंबर, २०२२ अन्वये उक्त रिट याचिकेत मा. उच्च न्यायालय, मुंबई, नागपूर खंडपीठ यांनी पारीत केलेला आदेश विचारात घेता, उक्त जमिनीवरील आरक्षणे व्यपगत झाल्याने उक्त अधिनियमाच्या कलम १२७ (२) चे तरतुदीनुसार आदेश निर्गमित करण्यास हरकत नसावी, असा अहवाल सादर केला आहे ;

आणि ज्याअर्थी, सहायक संचालक, नगर रचना, नागपूर शाखा, नागपूर यांचेकडील पत्र क्र. ७१३, दिनांक १७ मार्च, २०२३ अन्वये उक्त आरक्षणांनी बाधित होणारे उक्त जमिनींपैकीचे क्षेत्र मोजणी नकाशावर दर्शवून त्यानुसार केवळ सर्व्हे नं. ८४८ या जमिनीचे आ. क्र. ५९, "दुकान संकुल" या आरक्षणाने बाधित क्षेत्र १९३०.०० चौ. मी. व आ. क्र. ६०, "प्रसुतीगृह व दवाखाना" या आरक्षणाने बाधित क्षेत्र ४०००.०० चौ. मी. उक्त आरक्षणातून व्यपगत होत असल्याचे कळविले आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त मंजूर विकास योजनेतील उक्त जमिनींपैकी सर्व्हे नं. ८४८ या जमिनीपैकीच्या क्षेत्रावरील उक्त आरक्षणांबाबतची उपरोक्त नमूद वस्तुस्थिती पाहता, उक्त अधिनियमाचे कलम १२७ (२) चे तरतुदीनुसार उक्त जमिनीपैकी सर्व्हे नं. ८४८ या जमिनींपैकीच्या क्षेत्रावरील उक्त आरक्षणे व्यपगत झाल्याबाबतचे आदेश निर्गमित करणे आवश्यक आहे, असे संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे मत झाले आहे;

आणि ज्याअर्थी, शासनाच्या नगर विकास विभागाकडील निर्णय क्र. टिपीएस १८१३-३२११-प्र. क्र. ५०८-नवि-१३, दिनांक १ डिसेंबर २०१६ अन्वये नियोजन प्राधिकरण असलेल्या सर्व नगर परिषदा/नगर पंचायती/जिल्हा परिषदा यांच्या विकास योजना संबंधाने, उक्त अधिनियमाचे कलम १२७ (२) चे तरतुदीनुसार कार्यवाही करण्याचे शासनाचे अधिकार कलम १५१ चे तरतुदीनुसार संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना प्रदान केलेले आहेत ;

त्याअर्थी, आता, उक्त अधिनियमाचे कलम १२७ (२) चे तरतुदीनुसार संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे हे, या आदेशाद्वारे पुढील परिशिष्टात नमूद केल्याप्रमाणे उक्त मंजूर विकास योजनेतील उक्त जमिनीपैकी सर्व्हे नं. ८४८ या जमिनीपैकीच्या क्षेत्रावरील उक्त आरक्षणे व्यपगत झाले आहे, असे अधिसूचित करीत आहेत आणि त्यासाठी उक्त मंजूर विकास योजनेच्या उक्त अधिसूचनेमध्ये पुढीलप्रमाणे सुधारणा करीत आहे.—

उक्त मंजूर विकास योजनेच्या उक्त अधिसूचनेच्या बदलांच्या परिशिष्टामधील शेवटच्या नोंदीनंतर पुढील नविन नोंदीचा समावेश करण्यात येत आहे :–

**परिशिष्ट**

| अ. क्र. | नगर परिषद, मौजा, तालुका व जिल्हा | उक्त मंजूर विकास योजनेतील प्रस्ताव व वि. यो. अहवालानुसार अंदाजे क्षेत्र | उक्त जमिनीचा तपशील | उक्त आरक्षणातून उक्त जमिनीपैकी व्यपगत झालेले अंदाजे क्षेत्र |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| | | | | चौ. मी. |
| १ | काटोल नगर परिषद, मौजा काटोल, ता. काटोल, जि. नागपूर | आ. क्र. ५९, "दुकान केंद्र" अंदाजे क्षेत्र १९३०.०० चौ. मी. | सर्व्हे नं. ८४८ पै. | १९३०.०० |
| | | आ. क्र. ६०, "प्रसुती गृह व दवाखाना" अंदाजे क्षेत्र ४०००.०० चौ. मी. | | ४०००.०० |

**टीप.—**(१) उक्त आरक्षणांतून मुक्त झालेल्या उक्त जमिनींच्या लगतच्या जमिनीवर उक्त मंजूर विकास योजनेनुसार अनुज्ञेय होणा-या विकासाच्या प्रयोजनासाठी उक्त जमीन मालकांना उपलब्ध होईल.

(२) उक्त आरक्षणांतून मुक्त झालेल्या उक्त जमिनीचे क्षेत्र दर्शविणारा उक्त मंजूर विकास योजनेचा भाग नकाशा हा मुख्याधिकारी, काटोल नगर परिषद, काटोल, जि. नागपूर यांच्या कार्यालयात, कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत, नागरिकांच्या अवलोकनार्थ एक महिन्यापर्यंत खुला ठेवण्यात येत आहे.

(३) सदर आदेश संचालनालयाचे **www.dtp.maharashtra.gov.in** या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात येत आहे.

**अविनाश भा. पाटील,**
संचालक,
नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे.

पुणे :
दिनांक ३ एप्रिल २०२३.

ना.-एक-अ-२ (१५१५).

भाग १-अ (ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. १०५.

BY DIRECTOR OF TOWN PLANNING

MAHARASHTRA REGIONAL AND TOWN PLANNING ACT, 1966.

*ORDER*

No. DTP-D.P. Katol (R+AA)-Sec.-127(*2*)-Order-TPV-II-1569-2023.—

Whereas, the Development Plan of Katol Municipal Council (Revised +AA) has been partly sanctioned as per the provisions of Section 31 (*1*) of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (Mah. XXXVII of 1966) (hereinafter referred to as " the said Act ") by the Government in Urban Development Department *vide* Notification No. TPS-2406-3123-CR-133(A)-07-UD-9, dated 4th November, 2008 (hereinafter referred to as " the said Notification" ) and has come into force with effect from dated 15th December, 2008 (hereinafter referred to as " the said Sanctioned Development Plan ") ;

And whereas, in the said Sanctioned Development Plan, area admeasuring 1930.00 sq. m. of the land bearing S. No. 848 of Mouza Katol is affected by the Reservation Site No. 59, " Shopping Center " and area admeasuring 4000.00 sq. m. of the lands bearing S. No. 848, 849 of Mouza Katol is affected by the Reservation Site No. 60, " Maternity Home and Dispensary" (hereinafter referred to as " the said Reservations ") and the Appropriate Authority for the acquisition & development of the said Reservations is Municipal Council, Katol (hereinafter referred to as " the said Appropriate Authority ") ;

And whereas, the lands affected by the said Reservations have not been acquired by the said Appropriate Authority within 10 (ten) years from the date on which the said Sanctioned Development Plan come into force ;

And whereas, the concerned land owner (hereinafter referred to as "the said Land Owner") of the lands bearing S. No. 848, 849 which are affected by the said Reservations (hereinafter referred to as "the said Lands") had served a notice as per the provisions of Section 127(*1*) of the said Act, (hereinafter referred to as " the said Notice ") on the said Appropriate Authority on 30th April, 2019 ;

And whereas, the said lands under the said Reservations are not acquired or no steps as required as per the provisions of Section 127 (*1*) of the said Act has been taken by the Appropriate Authority, within the stipulated period from the date of service of the said notice by the said land owner as per the provisions of Section 127 of the said Act ;

And whereas, the Hon'ble High Court, Mumbai, Nagpur Bench in the Order dated 8th April, 2022 in Writ Petition No. 2270/2021 (hereinafter referred to as " the said Writ Petition ") has passed an order that, the said Reservations on the said lands have lapsed as per the provisions of Section 127 of the said Act ;

And whereas, Municipal Council, Katol *vide* Marathi letter No. नपका-नरवि-७२७-२०२२-४८९, dated 30th May, 2022 has communicated that "the Land acquisition proposal submitted to the District Collector, Nagpur of the said lands under the said reservations have been rejected *vide* Marathi letter No. एलएसी-कार्या-२५-कावी-२६०-२०२१, दिनांक २० सप्टेंबर, २०२१, as the period of 2 years from the date of service of notice is expired, also Special Leave Petition in the Hon'ble Supreme Court is not filed by Municipal Council, Katol" ;

And whereas, Assistant Director of Town Planning, Nagpur Branch, Nagpur *vide* letter No. 2660, dated 13th October, 2022 has submitted report stating that, in consideration of the Order passed by the Hon'ble High Court, Mumbai, Nagpur Bench, it would be appropriate to issue an order that, the said reservations have lapsed as per the provisions of Section 127(*2*) of the said Act ;

And whereas, Joint Director of Town Planning, Nagpur Division, Nagpur *vide* letter No. 1347, dated 29th November, 2022 has submitted report stating that, as per the Order passed by the Hon'ble High Court, Mumbai, Nagpur Bench, there is no objection to issue an order as per the provisions of Section 127(*2*) of the said Act, regarding lapsing of the said reservations on the said lands ;

And whereas, Assistant Director of Town Planning, Nagpur Branch, Nagpur *vide* letter No. 713, dated 17th March, 2023 has submitted measurment sheet showing the area affected by the said reservations and according to that, area of the land bearing only S. No. 848, admeasuring 1930.00 sq. m. is affected by Reservation No. 59, “ Shopping Complex ” and area admeasuring 4000.00 sq. m. is affected by of Reservation No. 60, “ Maternity Home and Dispensary ” have been lapsed from the said Reservations ;

And whereas, after considering the above facts in respect of the said Reservations on the land bearing S. No. 848 in the said Sanctioned Development Plan, the Director of Town Planning, Maharashtra State, Pune is of the opinion that, it is necessary to issue the order as per the provisions of Section 127 (*2*) of the said Act, regarding the lapsing of the said Reservations on the land bearing S. No. 848 ;

And whereas, the Government in Urban Development Department as per the provisions of Section 151 of the said Act, *vide* Resolution No. TPS-1813-3211-CR-508-UD-13, dated 1st December, 2016 has delegated the powers exercisable by it as per the provisions of Section 127 (*2*) of the said Act, in respect of Development Plans of all Municipal Councils/Nagar Panchayat and for the Development Plans undertaken by Zilla Parishad as a Planning Authority to the Director of Town Planning, Maharashtra State, Pune ;

Now, therefore, the Director of Town Planning, Maharashtra State, Pune, by this order and as specified in the Schedule hereinafter hereby notify the lapsing of the said Reservations in respect of the land bearing S. No. 848 as per the provisions of Section 127 (*2*) of the said Act & for that purpose amends the said Notification of the said Sanctioned Development Plan, as follows :—

After the last entry in the Schedule of Modifications accompanying the said Notification of the said Sanctioned Development Plan, the following new entry shall be added :—

SCHEDULE

| Sr. No. | Municipal Council, Mouza, Taluka and District | Proposal in the said Sanctioned Development Plan & its Approxi. Area as per D. P. Report | Description of the said Land | Approximate from the said land area lapsed from the said Reservation |
|---|---|---|---|---|
| (1) | (2) | (3) | (4) | (5) (Sq. mt.) |
| 1 | Katol Municipal Council, Mouza Katol, Taluka Katol, Dist. Nagpur | Site No. 59, “Shopping Center” Area 1930.00 Sq. m. | S. No. 848 (Part) | 1930.00 |
| | | Site No. 60, “Maternity Home and Dispensary” Area 4000.00 Sq. m. | | 4000.00 |

*Note.*— (1) The said land so released from the said Reservations shall become available to the said land owner for the purpose of development as otherwise permissible in the case of adjacent lands under the said Sanctioned Development Plan.

(2) A copy of the part plan of the said Sanctioned Development Plan showing the areas of the said land which are lapsed from the said Reservations is available in the office of the Chief Officer, Municipal Council, Katol, District Nagpur during office hours on all working days for inspection to public upto one month.

(3) This Order shall also be published on the Directorate’s official website *www.dtp.maharashtra.gov.in*.

AVINASH B. PATIL,
Director of Town Planning,
Maharashtra State, Pune.

Pune :
Dated the 3rd April 2023.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT PRESS AND BOOK DEPOT, CIVIL LINES, NAGPUR-440 001 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.